नि.दि.दावा क्र. ०३/२०१६
माधवराव व इतर.वि..कृष्णा व ईतर

आदेश नि. क्र. ३३ खाली
दिनांक: ११.०४.२०१९

१. प्रस्तूतचा अर्ज हा वादीने उपअधिक्षक भुमी अभिलेख उमरखेड, यांची कोर्ट कमीशनर म्हणुन नियुक्ती होणेसाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जातील कथन खालीलप्रमाणे आहे:

वादीने दावा मिळकतीची मोजणी होवुन अतिक्रमीत जमीनीचा ताबा प्रतिवादींकडुन मिळण्याकरीता तसेच कायमचा मनाई हुकुम मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. वादीने कथन केले आहे की, वादीच्या मालकीच्या शेतजमीनीची मोजणी करून हद्दीच्या खुणा कायम करण्याकरीता प्रतिवादींची संमंती असणे आवश्यक आहे. प्रतिवादी हे हद्दीच्या खुणा कायम करण्याकरीता संमंती देण्यासाठी तयार नाहीत. त्यामुळे वादीतर्फे निवेदन करण्यात आले की, या कामी उपअधिक्षक भुमी अभिलेख उमरखेड, यांची कोर्ट कमीशनर म्हणुन नियुक्ती होणे आवश्यक आहे.

३. प्रतिवादीं तर्फे असे निवेदन देण्यात आले की वादीनी दाव्यामध्ये दावा मिळकत ही त्याची वडीलोपार्जीत व स्वकष्टार्जीत मिळकत आहे याबाबत उल्लेख केलेला नाही. वादीला सन २०१३ मध्ये मोजणीची आवश्यकता का पडली, याबबात कारण नमुद केले नाही. प्रतिवादीची जमीन ही वडीलोपार्जीत आहे. प्रतिवादी हे त्यांच्या मिळकतीचे मालक व कब्जेदार आहेत. त्यामुळे प्रतिवादींनी दावा मिळकतीवर कब्जा करण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. वादीनी पुर्वीपासुनचे दावा मिळकतीचे महसुली रेकॉर्ड व फेरफार दाखल केले नाही. त्यामुळे वादीचा अर्ज हा मंजूर होणयास पात्र नाही. त्यामुळे वादीचा अर्ज हा नामंजुर करण्यात यावा.

४. वादीं व प्रतिवादींतर्फे युक्तीवाद ऐकला. वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादींच्या दावा मिळकतीची मोजणी होवुन अतिक्रमीत जमीनीचा ताबा प्रतिवादीकडुन मिळण्याकरीता तसेच मनाई हुकुमाकरीता दाखल केला. वादीने कथन केले की प्रतिवादी हे दावा मिळकतीची मोजणी करण्याकरीता संमंती देत नाहीत. त्यामुळे वादी ने प्रस्तुतचा दावा दाखल केला. वादी व प्रतिवादीमधील वाद संपुष्टात येण्यासाठी दावा मिळकतीची मोजणी होणे आवश्यक आहे व अतिक्रमणाबाबतचा अहवाल मागविणे आवश्यक आहे त्यामुळे मी खालील आदेश पारीत करीत आहे.

आदेश

१. वादीचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. तालुका भुमी अभिलेख उमरखेड अगर त्यांच्यातर्फे माहितीगार ईसम यांना कोर्ट कमीशनर म्हणुन नेमण्यात येते.

३. कोर्ट कमीशनर यांनी सदर आदेशापासुन २ महीन्यांच्या आत दावा मिळकतीची मोजणी करावी त्यातील पोटहिस्स्यांतील हद्द निश्चित करून दावा मिळकतीवर प्रतिवादींनी अतिक्रमण केलेले आहे किंवा नाही याबाबतचा अहवाल व नकाशा सादर करावा.

४. वादी यांनी मोजणीची फी संबंधीत कार्यालयाकडे त्वरीत जमा करावी.

५. आदेशानुसार कमीशन पत्र देण्यात यावे.

स्वा/–

(श्रीमती एस.एस.जाधव)

दिवाणी न्यायाधीश क.स्तर उमरखेड

दि. ११.०४.२०१९